**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील मृत कर्मचाऱ्यांना विद्यापीठातर्फे श्रद्धांजली**

अमरावती.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली विद्यापीठाच्या आस्थापनेतील तीस कर्मचाऱ्यांचे भिषण अपघातात दुःखद् निधन झाले. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारती जवळ संपन्न झालेल्या शोकसभेत शोकसंवेदना व्यक्त करतांना कुलगुरु म्हणाले, मानवी संवेदना व विद्यापीठ परिवारातील ऋणानुबंध आणि महाराष्ट्रातील विद्यापीठ परिवाराचा गोतावळा हा कृषी आणि अकृषी विद्यापीठाच्या नावांने ओळखला जातो. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील बत्तीस कर्मचाऱ्यांच्या दुःखद् निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर जो दुःखाचा डोंगर कोसळला, ते दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर त्यांना देवो, अशी प्रार्थना करून त्यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळले.

याप्रसंगी विद्यापीठाचे संवैधानिक अधिकारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सदस्य तसेच प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ३१/०७/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी